वर्ष-०८ | अंक-१२ | मुंबई, मंगळवार ०८ ते १४ फेब्रुवारी २०२२ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 डोक्याला 70 टाके पडेपर्यंत तलवारीने मारलं

3 → हॉटेलसमोर उभा होता तरुण, फिल्मी स्टाइलनं दोन तरुण दुचाकीवरुन आले अन्...

आंबा बागेकडे जाताना दुचाकीचा टायर फुटला; पुढे जे काही घडलं ते भयंकर... ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## येरवडा दुर्घटनाप्रकरणी चौघांना कोठडी



येरवड्यात बांधकामाच्या ठिकाणी लोखंडी जाळी पडून पाच कामगारांचा मृत्यू झाल्याप्रकरणी अटक केलेल्या चौघांना न्यायालयाने १५ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.संबंधित बांधकाम प्रकल्पाचा सेफ्टी सुपरवायझर इम्तियाज अबुल बरकात अन्सारी (वय ३८), लेबर कॉन्ट्रॅक्टर सुपरवायझर महंमद शरीफ हबीबूल रहेमान आलम (वय ३५), प्रोजेक्ट मॅनेजर मुजीफ इलिसा खान (४५, तिघेही रा. बिहार) आणि प्रोजेक्ट मॅनेजर असिस्टंट विजय एकनाथ धाकतोडे (२५, रा. शिक्रापूर) अशी पोलिस कोठडी सुनावलेल्या...पान २ वर...

# राऊतांचा भाजपवर निशाणा

### लतादीदींच्या स्मारकासाठी राम कदमांचे मुख्यमंत्र्यांना पत्र, राऊत म्हणाले - 'लतादीदींच्या स्मारकाबाबत राजकारण करू नये'

गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांचे रविवारी सकाळी मुंबईतील ब्रीच कॅन्डी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. लतादीदींच्या पार्थिवावर शिवाजी पार्क मैदानात शासकीय इतमामात अंतिम संस्कार करण्यात आले. आता याच शिवाजी पार्कमध्ये लता मंगेशकर यांचं स्मारक उभारावं अशी मागणी केली जात आहे. भाजप आमदार राम कदमांनी यासंदर्भात मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना पत्र लिहिले आहे. मात्र या मागणीसंदर्भात बोलताना शिवसेनेचे खासदार संजय



राऊत यांनी राम कदम यांच्या मागणीच्याविरोधात प्रतिक्रिया दिलीय. लतादीदींच्या स्मारकावरुन राजकारण नको असे राऊत म्हणाले आहेत.

राम कदमांच्या पत्राविषयी माध्यमांशी बोलताना राऊत म्हणाले की, 'लता दीदी या महान आत्मा होत्या. आपल्या धरतीवर त्यांनी जन्म घेतला आणि आपल्या महाराष्ट्राशी त्यांचे नाते होते. आपल्या देशात त्या जन्माला आल्या हे आपले भाग्य. त्या शरीराने गेल्या. मात्र आत्मा आपल्याकडे ...पान २ वर...

## रुग्णालयातून नवजात बाळ पळवले




जालना: शासकीय महिला व बाल रुग्णालयातून नवजात बाळाला पळवून नेल्याची घटना घडली आहे. काल रात्रीच जन्मलेल्या बाळाला पळवल्याने परिसरात एकच खळबळ माजली आहे.रुकसाना अहमद या महिलेला काल प्रसूतीसाठी महिला व बाल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रात्री ११ वाजता या महिलेने गोंडस मुलाला जन्म दिला. सकाळी एका महिलेने बाळाला गरम पाण्याने आंघोळ घालण्यासाठी पाणी देते म्हणून रुकसाना या महिलेच्या जावेला रुग्णालयात पाणी आणून बाळाला आंघोळ घातली. रुकसाना यांची जाऊ बाहेर जाताच...पान २ वर...

## धक्कादायक! व्यापाऱ्याला जीवे मारण्याचा प्रयत्न

उल्हासनगर: उल्हासनगरात एका व्यापाऱ्याला जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना घडली आहे. व्यावसायिक स्पर्धेतून हा हल्ला करण्यात आला असून हल्ल्याची घटना सीसीटीव्हीत सुद्धा कैद झाली आहे. उल्हासनगरच्या कॅम्प १ भागात राहणाऱ्या रवी पेसवानी यांचं गोलमैदान परिसरात फास्ट फूड



सेंटर आहे. याच परिसरात आरोपी पवन गुप्ता याचंही स्नॅक्स आणि ज्यूस सेंटर आहे. मात्र रवीच्या दुकानामुळे आपल्या व्यवसायावर परिणाम होत असल्याची आरोपी पवन गुप्ताची धारणा होती. यातूनच त्यानं २५ जानेवारीच्या पहाटे रवी पेसवानी याला जीवे मारण्यासाठी थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र रवी तिथून निसटून पळून गेला. यानंतर १ फेब्रुवारीच्या मध्यरात्री रवी हा गोलमैदान परिसरातून दुचाकीवर त्याच्या मित्रासह जात असताना पवन गुप्ता यानं आणखी ४ साथीदारांसह त्याला रस्त्यात थांबवत त्याच्यावर तलवार, चॉपर, हातोडा, स्टीलचा पाईप यानं हल्ला करत जीवे मारण्याचा प्रयत्न केला. मात्र सुदैवानं ...पान २ वर...

## १ रूपयाचं ट्रान्झेक्शन करून १४ ज्वेलर्स, ३२ हॉटेलना लाखोंचा चुना

ठाणे : देशभरातील व्यावसायिकांची लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या एका तरुणाला ठाण्यातील वर्तकनगर पोलिसांनी अटक केली आहे. हा तरुण गेल्या अनेक दिवसांपासून देशभरातील अनेक राज्यांमध्ये जाऊन हॉटेल्स आणि दुकानदारांची फसवणूक करत



होता. त्यांने आतापर्यंत १४ ज्वेलर्स आणि ३२ हॉटेल्सना तब्बल ३० लाख रुपयांना गंडा घातल्याचं उघड झालं आहे. पोलिसांनी त्याला अटक करून कोर्टात हजर केले. कोर्टाने त्याला ७ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. ठाण्यातील ज्युपिटर येथील ब्लू स्टोन ज्वेलरीच्या दुकानात २८ जानेवारी रोजी एका तरुणानं ९७ हजार ३३० रुपये किंमतीचे दागिने खरेदी...पान २ वर...

## रिक्षा चालकांची उबेर शेअर बाईक चालकाला जबर मारहाण



पिंपरी – पिंपरी चिंचवडमधील पुनावळे गावात उबेर शेअर बाईक (Uber share bike) चालकाला रिक्षा चालकांकडून(Auto Driver) गंभीर मारहाण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. तीन रिक्षा चालकांनी केलेल्या मारहाणीत अंकुश कृष्णा सूर्यवंशी (26रा. साईनाथ कॉलनी, विनायक नगर, नवी सांगवी, मूळ रा. घाणव, ता. पाटण, जि. सातारा) मारहाणीत गंभीर जखमी झाले आहेत. या प्रकरणी पोलिसांनी (Police) शरणबसप्पा शामराव पांचाळ (वय 36, दोघेही रा. कोयतेवस्ती, पुनावळे), हनुमंत बिभीषण माने (वय 23, रा. पुनावळे) या दोघांना अटक केली आहे तर तिसरा आरोपी बाबुराव शामराव पांचाळ (वय 42) घटना स्थळावरून फरार झाला आहे.

अशी घडली घटना शहरातील पुनावळे परिसरात पीडित अंकुश सूर्यवंशी हा परवाना धारक वाहन चालक आहे. उबेर शेअर बाईकद्वारे प्रवासी वाहतूक करण्याचे काम करतात मात्र उबेर शेअर बाईकमुळे त्या परिसरातील स्थानिक रिक्षा चालकांचा धंदा होत नव्हता. त्यामुळे स्थानिक रिक्षा चालकांच्या मनात त्यांच्याविषयी...पान २ वर...

## घाईगडबडीत रिक्षातून उतरले, 5 लाखाचे हिरे रिक्षातच विसरले! कशी शोधली पोलिसांनी बॅग?

### बॅगमध्ये हिऱ्यांसोबत महत्त्वाची कागदपत्रही होती.

मीरा रोड : मुंबईत रिक्षावाल्यांचा प्रामाणिकपणाची अनेक उदाहरणं तुम्ही ऐकली असतील. प्रवासी चुकून कधी एखादी गोष्ट विसरला, तर रिक्षा चालक त्याला ती आठवणीनं दिल्याच्या अनेक घटना मुंबईत रिक्षाने प्रवास करणाऱ्यांच्या बाबतीत घडलेल्या असतील. अशीच एक घटना आता पुन्हा एकदा समोर आली आहे. एका रिक्षात प्रवासी चक्क पाच लाख रुपयांचे हिरे घाईगडबडीत रिक्षातून उतरताना विसरला. रिक्षातून उतरल्यानंतर बॅग रिक्षातच राहिल्याचं त्याला लक्षात आलं. प्रचंड कासावीस झालेल्या या प्रवाशानं आता करायचं काय, असा प्रश्न पडला. अखेर शेवटचा पर्याय म्हणून या प्रवाशानं पोलिस स्टेशन गाठलं आणि मदत घेण्याचा प्रयत्न केला. अखेर पोलिसांनी परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेत लगेचच सीसीटीव्ही फुटेज तपासून घेतलं. त्यामुळे या प्रवाशाच्या



जीवात जीव आलाय.

नेमकं कुठे घडला प्रकार? झालं काय?

34 वर्षांचे राहुल लुनावत हे पत्नी आणि लहान मुलीसोबत गुरुवारी कांदिवली ते भाईंदर असा प्रवास रिक्षातून करत होते. रिक्षाच्या मागील बाजूला त्यांनी एक बॅग ठेवली होती. भाईंदरमध्ये उतरताना त्यांची घाईगडबड झाली. या घाईगडबडीत रिक्षात मागे ठेवलेली बॅग ते तिथंच विसरले. यानंतर रिक्षा निघून गेल्यावर रिक्षातील बॅगमध्ये पाच लाखाचे हिरे ठेवले असल्याचं त्यांच्या लक्षात आलं.

कशी मिळली बॅग परत?

आता काय करावं, अशा विचारात असतातना राहुल यांनी पोलिस स्टेशन गाठलं. आपली बॅग रिक्षात राहिल्याचं पोलिसांच्या निदर्शनास आणून दिलं. बॅगमध्ये हिऱ्यांसोबत...पान २ वर...

## वीजमीटरमध्ये फेरफार करून तब्बल २ कोटी २५ लाख रूपयांची वीजचोरी



कोल्हापूर : वीजमीटरमध्ये फेरफार करून वीजेच्या ९ लाख २४ हजार ३५९ युनिटची म्हणजेच आर्थिक स्वरूपात २ कोटी २५ लाख रूपयांची वीजचोरी केल्याचं उघडकीस आलं आहे. या प्रकरणी महावितरणने हातकणंगले तालुक्यातील कारोची येथील अजय अशोक मेंडगुदले व अशोक महादेव मेंडगुदले यांच्याविरूद्ध पोलिसात गुन्हा नोंदवला आहे. महावितरणच्या 'इचलकरंजी ब' उपविभागाच्या मेंडगुदले यांच्या वीजमीटर व विद्युत संच मांडणीची पंचासमक्ष एमआरआयद्वारे तपासणी केली. सदर तपासणीत वीजेचा वापर सुरू असताना मीटरवरील वीजदाब व वीजप्रवाह शून्य असल्याचे निदर्शनास आले. त्याचवेळी शेजारील एका ग्राहकाच्या वीजमीटरची एमआरआयद्वारे तपासणी केली असता मीटरवर वीजदाब योग्य असल्याचे आढळून आले. कोल्हापूरच्या बापट कॅम्प स्थित मीटर चाचणी प्रयोगशाळेत वीजचोरी प्रकरणातील दोन्ही वीज मीटरची पुढील तपासणी करण्यात ...पान २ वर...

# 30 वर्षांच्या विवाहितेसह चार लहान मुलांची अमानुष हत्या

बंगळुरु : विवाहिता आणि चार लहान मुलांची एकाच घरात हत्या (Murder) झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. कर्नाटकातील (Karnataka) कृष्णराजसागर परिसरात हा प्रकार घडला आहे. 30 वर्षीय महिलेसह तिची तीन मुलं आणि भाचा अशा चार चिमुरड्यांना जीवे ठार मारण्यात आलं. महिलेच्या राहत्या घरीच हे हत्याकांड घडले आहे. महिलेसह चारही मुलांना चाकूने भोसकल्याचं (Knife Attack) उघड झालं आहे. रविवारी सकाळी हा प्रकार समोर आला. बराच वेळ कोणीही दरवाजा न उघडल्यामुळे शेजाऱ्यांना संशय आला. त्यांनी पोलिसांना




माहिती दिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. प्लॅस्टिक वस्तू विक्रेत्याच्या पत्नी आणि मुलांची राहत्या घरात निर्घृण हत्या झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. ही घटना उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अधिक तपास सुरु केला आहे.

**राजस्थानचं कुटुंब कर्नाटकात**

मयत 30 वर्षीय लक्ष्मी गृहिणी होती. तिचा दहा वर्षांचा मुलगा, सात वर्षांची मुलगी, चार वर्षांचा मुलगा आणि आठ वर्षांचा भाचा अशा एकूण पाच जणांची हत्या करण्यात आली. हत्येचं कारण अद्याप अस्पष्ट असून ही हत्या कोणी केली, हे सुद्धा समजलेलं नाही. हे कुटुंब मूळ राजस्थानचं असून कामानिमित्त कर्नाटकात स्थायिक झालं होतं.

**पाचही जणांवर सपासप वार**

पोलिसांनी सांगितले की पाचही जणांवर अनेक वेळा वार करण्यात आले होते. प्रत्येक जण रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळला. मारेकऱ्यांनी घरातून काही मौल्यवान वस्तू घेतल्याचे दिसून येत आहे, परंतु ही हत्या चोरीच्या उद्देशाने झाली की आणखी काही हेतू होता याचा तपास पोलिसांना करत आहेत. अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

**शेजाऱ्यांनाही जाग आली नाही**

शनिवारी रात्री लक्ष्मीचा पती घरी नव्हता. पोलिस शेजाऱ्यांची चौकशी करत आहेत. पाच जणांची निर्घृण हत्या होत असताना शेजाऱ्यांपैकी एकालाही कोणाचा आवाज कसा ऐकू आला नाही, याचे पोलिसांना आश्चर्य वाटत आहे. "आम्ही अद्याप हे खून चोरीच्या उद्देशाने झाल्याची पुष्टी करु शकलेलो नाही.

लहान मुलांची इतक्या निर्दयीपणे हत्या करण्यात आली असल्याने, यामागे एखादा मजबूत हेतू असू शकतो.

## शिरूरमध्ये आजी आजारी असल्याचे सांगत केले डॉक्टरचे अपहरण



पुणे – जिल्ह्यात गुन्हेगारीच्या(crime) घटना वाढत असताना गुन्हे करण्यासाठी नवनवीन प्रकार वापरले जातात. पुणे जिल्ह्यातील शिरूर येथे अशीच घटना घडती आहे. शिरूर येथे एका नामांकित डॉक्टरचे पेशंट तपासण्याच्या बहाण्याने अपहरण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. इतकच नव्हे तर अपहरण केलेल्या डॉक्टरला (doctor) सोडण्यासाठी सुमारे तीन लाखाची खंडणी घेतल्याच्या माहिती समोर आली आहे. त्या प्रकरणी शिरणार पोलिसांनी तब्बल आठ जणांवर शिरूर पोलिस ठाण्यात...पान २ वर...

# डोक्याला ७० टाके पडेपर्यंत तलवारीने मारलं




औरंगाबाद : औरंगाबाद शहरातील पुंडलीकनगर पोलीस ठाणे हद्दीत, स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणाला दुकानातून फुकट तंबाखू, गुटखा देत नसल्याने परिसरातील गुंडांनी फायटर, तलवारीने रक्तबंबाळ होईपर्यंत मारहाण केली आहे. ज्यात या तरुणाच्या डोक्याला ७० टाके पडली आहे. विशेष म्हणजे दोन दिवसांपूर्वीच या गुंडाचा हातात तलवारी घेऊन लग्नात नाचतानाचा व्हिडीओ समोर आला होता. शुभम विनायक मनगटे (२४, रा. साईनगर,शिवाजीनगर ) याने दिलेल्या तक्रारीनुसार, तो सध्या स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहे. तर घरातच किराणा दुकान सुद्धा आहे. दरम्यान ०५ जानेवारी रोजी शुभम एका लग्नसमारंभासाठी मित्रांसोबत गेला होता. त्याचवेळी घरावर बाहेरून काही तरुण लाथा घालत असल्याचा शुभमला भावाने फोन करून सांगितले. त्यामुळे शुभम मित्रांसोबत तात्काळ घरी आले असता तोपर्यंत दुकानाला लाथा मारणारे संशयित निघून गेले होते. तर दुकानाला लाथा मारणारे परिसरातील गुंड यश पाखरे आणि त्याचे साथीदार असल्याचं शुभमला घरच्यांनी सांगितले. दरम्यान काही दिवसांपूर्वी गुंड यश पाखरे व त्याच्या साथीदारांनी फुकटात तंबाखू व गुटखा न दिल्यामुळे शिवीगाळ करून तुला पाहून घेईल अशी धमकी दिली होती.

त्यानंतर पुन्हा घरावर येऊन राडा घातल्याने शुभमच्या परिचयाचा आणि यश पाखरेचा मावस भाऊ असलेल्या राजू पठाडे याच्याकडे जाऊन शुभम झालेली घटना सांगत असतानाच, तिथे यश पाखरे आणि त्याचे साथीदार आले.

# मूकबधीर तरुणाचा गोदामाला पहारा, महिलांकडून ने-आण, मुंबईत गांजा तस्करीच्या टोळीचा पर्दाफाश

मुंबई : अंमली पदार्थ प्रकरणी (Drugs) मुंबईत पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर त्यापैकी तिघा जणांना पोलिसांनी अटक केली आहे. एनडीपीएस कायद्याच्या अंतर्गत मुंबईतील दिंडोशी पोलिसांनी (Mumbai Crime) ही कारवाई केली. आरोपी गांजाची खेप अंधेरी परिसरात ठेवायचे, तिथून मुंबईतील विविध भागात नेऊन विकायचे. यामध्ये 2 महिलांचा समावेश आहे. विशेष बाब म्हणजे एक मूकबधिर व्यक्ती हे गोदाम चालवत होती. तर महिला गांजाच्या पुड्या बनवून बाजारात पाठवत असत.



पोलिसांनी या प्रकरणी एकूण पाच जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे, तर तिघा आरोपींच्या मुसक्या आवळण्यात यश आलं आहे. गोदामात 23 किलो गांजा सापडला आहे. या गांजाची बाजारातील किंमत तब्बल 2 लाख 30 हजार रुपये इतकी असल्याची माहिती आहे.

काय आहे प्रकरण?

आरोपी गांजाची खेप अंधेरी परिसरात ठेवायचे आणि तिथून मुंबईतील विविध भागात विकायचे. यामध्ये दोघी महिलांचा समावेश आहे. एक मूकबधिर व्यक्ती हे गोदाम चालवत होती. तर महिला गांजाच्या पुड्या तयार करुन बाजारात पाठवत असत. पोलिसांनी त्यांच्याकडून 23 किलो गांजा जप्त केला असून त्याची किंमत 2 लाख 30 हजार इतकी आहे.या प्रकरणी पोलिसांनी तिघा जणांना अटक केली असून, दोन्ही महिलांना समन्स बजावण्यात आले आहे. अशरफ सय्यद (30 वर्ष), महेश शांतीलाल बिंद (33 वर्ष) (मूकबधिर) आणि मोबीन मेहबूब सय्यद (25 वर्ष) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. एनडीपीएस कायद्याच्या अंतर्गत मुंबईतील दिंडोशी पोलिसांनी ही कारवाई केली.

कसा अडकला जाळ्यात?

मुंबईतील गोकुळ धाम परिसरात एक व्यक्ती गांजा विकत असल्याची माहिती दिंडोशी पोलीस ठाण्याचे तपास अधिकारी सुरज राऊत यांना मिळाली होती. पोलिसांनी घटनास्थळी सापळा रचून गांजा विक्री करण्यासाठी आलेल्या तरुणाला अटक केली.

आपीला ताब्यात घेत पोलिसांनी त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे 50 ग्रॅम गांजा आढळला. यानंतर पोलिसांनी आरोपीची कसून चौकशी केली तेव्हा त्याने गांजा तस्कर आणि त्यांच्या ठिकाण्यांची माहिती दिली.


## पत्नीपासून विभक्त होण्याच्या भीतीने युवकाचा आत्महत्येचा प्रयत्न



पत्नीपासून विभक्त होण्याच्या भीतीने उमरेड पोलिस स्टेशनच्या आवारात युवकाने किटकनाशक प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. ही खळबळजनक घटना शुक्रवारी दुपारी घडली. युवकावर खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. प्रदीप (वय ३४, मूळ रा. मध्य प्रदेश), असे युवकाचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार, प्रदीप हा खासगी काम करीत असून तो पूर्व नागपुरात राहतो. काही दिवसांपूर्वी शादी डॉटकॉम या विवाह संकेतस्थळावर त्याची उमरेडमधील एका विधवेशी ओळख झाली. त्याने तिचा मोबाइल क्रमांक घेतला. दोघेही चॅटिंग करायला लागले. दोघांनी लग्नाचा निर्णय घेतला. ती दोन अपत्यांसह प्रदीपसोबत रहायला लागली. दोघांनी लग्न केले. दरम्यान, महिला बेपत्ता झाल्याने नातेवाइकांनी उमरेड पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी बेपत्ता असल्याची नोंद घेत महिलेचा शोध सुरू केला. ती प्रदीपसोबत राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी महिलेला विचारणा केली असता, प्रदीपसोबत लग्न केल्याचे तिने सांगितले. लग्नाचे दस्तऐवज सादर करण्याची सूचना पोलिसांनी दोघांना केली. शुक्रवारी प्रदीप आणि महिला दोन अपत्यांसह उमरेड पोलिस स्टेशनमध्ये आले. महिलेचे नातेवाइकही तेथे होते. पत्नी आता आपल्यापासून विभक्त होईल, अशी भीती प्रदीपला वाटली. तो जवळील दुकानात गेला. तेथून किटकनाशक खरेदी केले. पोलिस स्टेशनच्या आवारात येऊन त्याने किटकनाशक प्राशन केले. या घटनेने पोलिसांमध्ये खळबळ उडाली. पोलिसांनी लगेच प्रदीपला खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे.

# 11 वर्षांचे प्रेमसंबंध, मुंबईतील 28 वर्षीय तरुणीचा पालघरमध्ये खून

मुंबई : जवळपास गेल्या 10 दिवसांपासून बेपत्ता असलेल्या मुंबईकर तरुणीची हत्या (Mumbai Murder) झाल्याचं उघडकीस आलं आहे. मुंबईतील विले पार्ले भागात राहणारी 28 वर्षीय कॅरल मिस्किटा (C A R O L MISQUITTA) पालघरमधील वाघोबा घाट परिसरात (Waghoba Ghat Palghar) मृतावस्थेत आढळली. कॅरलच्या हत्ये प्रकरणी पोलिसांनी तिच्या बॉयफ्रेण्डसह दोघा जणांना अटक केली आहे. 24 जानेवारीच्या रात्री कॅरल विले पार्ल्यातील घरातून प्रियकराला भेटण्यासाठी बाहेर गेली, त्यानंतर बेपत्ता झाली होती. 3 फेब्रुवारीला तिचा मृतदेह मुंबईला लागून असलेल्या पालघर जिल्ह्यात आढळला. गुन्ह्यात वापरलेला चाकू कॅरलच्या छातीत अडकल्याचे शव विच्छेदनादरम्यान आढळून आले. बीपीओमध्ये काम करणारी कॅरल आपल्या 56 वर्षीय आईसोबत राहत होती. कॅरल रिलेशनशीपमध्ये असलेला तिचा प्रियकर झिको मिस्किटा (27 वर्ष) आणि त्याच्या अन्य एका साथीदाराला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. कॅरलच्या कुटुंबीयांनी 25 जानेवारी रोजी स्थानिक पोलिसात ती हरवल्याची




तक्रार दाखल केली होती, मात्र पोलिसांनी तक्रारीची गांभीर्याने दखल घेतली नसल्याचा दावा केला जातो. म्हणून तिला न्याय मिळवून देण्यासाठी रविवारी संध्याकाळी विलेपार्ले येथील सेंट फ्रान्सिस झेवियर्स चर्च येथून एक कँडल मार्च काढण्यात येणार आहे.

नेमकं काय घडलं?

कॅरल मिस्किटा मुंबईतील एका बीपीओ कंपनीत नोकरी करत होती. ती आपल्या 56 वर्षीय आईसह पार्ल्यात राहत होती. 2011 पासून आरोपी झिको मिस्किटासोबत तिचे प्रेमसंबंध होते. आरोपी तिच्यापेक्षा वर्षाने लहान आहे. मध्यंतरी त्यांचे ब्रेकअप झाले होते, मात्र नंतर ते पुन्हा एकत्र आले. 24 जानेवारी रोजी रात्री 10 वाजताच्या सुमारास कॅरल तिच्या स्कूटीवरुन बॉयफ्रेण्ड झिकोला भेटण्यासाठी निघाली. झिकोही त्याच्या स्कूटरवरून आला होता. त्याचा सहकारी कुमार देवेंद्र (30) त्याच्यासोबत होता. मध्यरात्री 12.20 च्या सुमारास कॅरलने तिच्या आईला फोन केला आणि थोड्याच वेळात आपण घरी परत येणार असल्याचे तिने आईला सांगितले. पहाटे 3 ते 4 वाजताच्या दरम्यान पालघरमधील मुंबई-अहमदाबाद महामार्गावर कॅरल आणि झिको यांच्यात वाद झाला. त्यानंतर झिकोने कॅरलचा गळा दाबून खून केला आणि तिच्यावर चाकूने वारही केल्याचा आरोप आहे. तसेच तिचा चेहरा विद्रूप करण्यासाठी त्याने दगडाने ठेचला.

वाघोबा घाटात मृतदेह फेकला

झिको हा चाकू सोबत घेऊन गेला होता, असा दावा पोलिसांनी केला आहे. हत्या केल्यानंतर झिको आणि त्याच्या साथीदाराने वाघोबा घाट परिसरात मुख्य रस्त्यापासून सुमारे 15 फूट अंतरावर तिचा मृतदेह फेकून दिला. त्यानंतर त्यांनी तिची स्कूटर दुसऱ्या ठिकाणी झुडपात लपवून ठेवली आणि सकाळी सहा वाजताच्या सुमारास ते मुंबईला परतले, असे पोलिसांनी सांगितले.

**असा लागला शोध**

कॅरल घरी परतली नाही तेव्हा तिच्या आईने दुसऱ्या दिवशी सकाळी सांताक्रूझ पोलिसांशी संपर्क साधला. सांताक्रूझ पोलिसांनी तपास सुरू केला पण तिचा शोध लागत नव्हता. 10 दिवसांनंतर, 3 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 5.30 च्या सुमारास रस्त्याशेजारील झाडाजवळ लघुशंका करण्यासाठी गेलेल्या एका व्यक्तीला तिच्या कुजलेल्या मृतदेहाचा उग्र वास आला आणि त्याने पालघर पोलिसांना याविषयी माहिती दिली. पालघर पोलिसांनी जवळपासच्या जिल्ह्यांमधील बेपत्ता व्यक्तींबाबत तक्रारींचा शोध घेतला आणि कॅरलची ओळख पटली. त्यानंतर त्यांनी संपूर्ण मार्गावरील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले, तेव्हा दोघे आरोपी निश्चित झाले. या प्रकरणाचा तपास करत असलेल्या पालघर पोलिसांच्या उपविभागीय पोलिस अधिकारी (S D P O) नीता पाडवी यांनी सांगितले की, “आम्ही दोघा आरोपींना अटक केली आहे आणि त्यांना न्यायालयात हजर केले असून दोघांना 10 फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.”

## महिलेला अटक न करण्यासाठी नातेवाईकाकडे मागितली लाच; पोलीस अडकला जाळ्यात!



कोल्हापूर : तक्रारदाराच्या आत्याला अटक न करण्यासाठी दोन हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पोलीस आणि पोलीस पाटलाला ताब्यात घेतलं आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलिसांनी या कारवाईबाबत माहिती दिली.

हातकणंगले तालुक्यातील शहापूर पोलीस ठाण्याकडून तक्रारदाराच्या आत्याच्या नावे वॉरंट निघाले होते. या कारवाईत आत्याला अटक न करण्यासाठी शहापूर पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी आसिफ नसृद्दीन सिराजभाई याने तक्रारदाराकडे दोन हजार रुपयाची लाच मागितली. लाच प्रकरणात यड्रावचा पोलीस पाटील जगदीश गोपाल संकपाळ हा मध्यस्थ होता. लाचेच्या रकमेत तडजोड करत १५०० रुपये लाच स्वीकारण्याची तयारी पोलीस कर्मचारी सिराजभाई याने दाखवली. लाचेसंदर्भात तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. या विभागाने गुरुवारी तक्रारीची पडताळणी केली. त्यानंतर आज शुक्रवारी पोलिसांनी सापळा रचला. शहापूर पोलीस ठाण्याच्या परिसरात पोलीस कर्मचारी आसिफ सिराजभाई आणि पोलीस पाटील जगदीश संपकाळ हे दोघे दीड हजार रुपयांची लाच स्वीकारत असताना पोलिसांनी दोघांना रंगेहात पकडले.

## पृष्ठ १ वरुन

### राऊतांचा भाजपवर निशाणा

आहे. त्या अमर आहेत, अमर राहतील. काही लोक त्यांच्या स्मारकाविषयी बोलत आहेत. बोलू द्या. त्यांचं स्मारक बनवणे एवढे सोपं नाही. त्या काही राजकीय नेत्या नव्हत्या. त्या खूप मोठ्या आणि.महान होत्या. त्यांच्या स्मारकाबाबत देशाला विचार करावा लागेल' असे म्हणत त्यांनी केंद्रीय स्तरावर त्यांच्या स्मारकाविषयी अप्रत्यक्ष मागणी केली आहे. तसेच स्मारकाविषयी राजकारण करु नका असा टोलाही त्यांनी भाजपला लगावला आहे.

काय म्हणाले होते राम कदम?

राम कदम यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहून लता दीदींचे स्मारक उभारण्याची मागणी केली होती. ते म्हणाले होते की, 'तुम्हाला माहिती आहेच की, दिवंगत भारतरत्न लता दीदींवर मुंबईतील शिवाजी मैदान (शिवाजी पार्क) दादर येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यामुळे करोडो चाहते, संगीत प्रेमी आणि लता दीदींच्या हितचिंतकांच्या वतीने माझी नम्र विनंती आहे की दिवंगत भारतरत्न लता दीदी यांचे स्मारक शिवाजी पार्कमध्ये ज्या ठिकाणी त्या पंचतत्त्वात विलीन झाल्या त्याच ठिकाणी उभारण्यात यावे.' पुढे ते म्हणाले की, 'आपणास विनंती आहे की जनतेच्या या मागणीचा आदर करत स्मारक त्वरित बांधले जावे, जेणेकरून हे ठिकाण जगाचे प्रेरणास्थान बनेल. तुमचा, राम कदम.'

### येरवडा दुर्घटनाप्रकरणी चौघांना कोठडी

चौघांची नावे आहेत. त्यांच्यावर सदोष मनुष्यवधासह विविध कलमांखाली येरवडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. येरवड्यातील शास्त्रीनगर चौक परिसरात ब्लू ग्रास बिझनेस पार्क या इमारतीच्या टॉवर उभारणीचे काम करताना गुरुवारी रात्री कामगारांच्या अंगावर लोखंडी सळयांचे छत कोसळले. या दुर्घटनेत पाच कामगारांचा जागीच मृत्यू झाला असून, चार कामगार जखमी झाले. बांधकाम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षेची योग्य दक्षता न घेतल्याने ही दुर्घटना घडल्याचे निष्पन्न झाल्यावर पोलिसांनी या चौघांना अटक करून शनिवारी न्यायालयात हजर केले. दुर्घटनास्थळाचे जागामालक, परवान्याचे काम पाहणारी कंपनी आणि बांधकाम करणारी कंपनी यांच्यातील कराराचे कागदपत्र प्राप्त करायचे आहेत, या गुन्ह्यात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याबाबत तपास करायचा आहे. दुर्घटना घडली, त्या वेळी काम करणारे कामगार, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचा जबाब नोंदवायचा आहे, त्यासाठी आरोपींना पोलिस कोठडी देण्याची मागणी सरकारी वकील योगेश कदम यांनी केली. न्यायालयाने ती मान्य केली.

अटक आरोपी 'लेबर सेफ्टी' कंपनीचे कामगार

या प्रकरणी पोलिसांनी अटक केलेले चारही आरोपी एमपीसीएल कंपनी आणि सीएनडब्लू कंपनीचे कामगार आहेत. या कंपन्या कामगार सुरक्षाविषयक कामकाज पाहतात. त्याबाबतही आरोपींकडे तपास केला जाणार आहे.

### धक्कादायक! व्यापाऱ्याला जीवे मारण्याचा प्रयत्न

रवी पेसवानी आणि त्याचा मित्र हे त्यांची गाडी तिथेच सोडून पळून जाण्यात यशस्वी झाले. यानंतर हल्लेखोरांनी त्याच्या दुचाकीची तोडफोड केली. ही सगळी घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली. याप्रकरणी रवी याने उल्हासनगर पोलीस ठाण्यात तक्रार केल्यानंतर पोलिसांनी पवन गुप्ता आणि त्याच्या साथीदारांविरोधात हत्येच्या प्रयत्नासह आर्म्स ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला. याप्रकरणी पोलिसांनी अद्याप कुणालाही अटक केलेली नसून आरोपींचा कसून शोध सुरू असल्याची माहिती उल्हासनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम यांनी दिली आहे. दरम्यान, या प्रकरणात आरोपी अजूनही मोकाट असल्यानं आपल्या जीवाला धोका असल्याची भीती तक्रारदार रवी पेसवानी याने व्यक्त केली. त्यामुळं पोलिसांनी आरोपींना लवकरात लवकर पकडण्याची मागणी त्याने केली आहे.

### १ रूपयाचं ट्रान्झेक्शन करून १४ ज्वेलर्स

केले. हे दागिने खरेदी केल्यानंतर आरोपीने ऑनलाइन पेमेंट केले. पेमेंट केल्याचा स्क्रीनशॉट त्यानं ज्वेलर्स चालकाला दाखवला; मात्र शंका आल्याने त्यांनी दरवाजे बंद करून घेतला आणि पोलिसांना कळवले. पोलीस घटनास्थळी पोहोचल्यानंतर पोलिसांनी त्या तरुणाचा डाव उघड केला. फसवणूक करणाऱ्या तरुणाला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता, त्याने भारतातील १४ ज्वेलर्स आणि ३२ हॉटेल्समध्ये अशा प्रकारे फसवणूक करून २० ते ३० लाखांना गंडा घातला असल्याचे तपासात उघड झाले. त्यानंतर पोलिसांनी त्याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

### घाईगडबडीत रिक्षातून उतरले, 5 लाखाचे हिरे

महत्त्वाची कागदपत्रही होती. ही बाब लक्षात येताच पोलिस निरीक्षक मुगूट पाटील यांनी आपल्या टीमला कामाला लावलं. उपनिरीक्षक किरीण कदम, गजानन चव्हाण, नितीन बोरसे यांच्या पथकाला शोध मोहिमेवर पाठवलं. पोलिसांनी तत्काळ सीसीटीव्ही फुटेजची मदत घेतली.पाच ते सहा ठिकाणचं फुटेज तपासल्यानंतर पोलिसांना अखेर नेमकी रिक्षा सापडली. यानंतर वाहतूक पोलिसांच्या मदतीनं पोलिसांनी रिक्षा मालकाचा पत्ता मिळवला. मग कांदिवलीतील ठाकूर विलेज भागात जाऊन शोध घेत पहिल्या मालकाकडून दुसऱ्या मालकाची माहिती मिळाली. अशाप्रकारे पोलिसांना अखेर तो रिक्षावाला सापडलाच.

मग पोलिसांनी रिक्षात विसरलेली बॅग आपल्या ताब्यात घेऊन ती नंतर राहुल यांना सुपूर्द केली.रिक्षाचालकाचा माहीतच नव्हतं!दरम्यान, मीरा रोडला प्रवाशांना सोडून परतल्यानंतर रिक्षा चालकानं बॅग कुणीतरी विसरलं आहे, याची पुसटीशी कल्पना नव्हती. पण पोलिसांनी विचारल्यानंतर अखेर रिक्षाच्या मागे एक बॅग आढळली. यानंतर ती बॅग सुरक्षित राहिल्याचं रिक्षावाल्यालाही आश्चर्य वाटलंय. मात्र ही बॅग सुखरुप पुन्हा राहुल यांना मिळाल्यामुले त्यांना मोठा दिलासा मिळालाय.

### रुग्णालयातून नवजात बाळ पळवले

डोळयाचे पाते लवते न लवते तोच या महिलेने बाळाला घेऊन पोबारा केल्याचा आरोप नातेवाईकांकडून केला जात आहे.

घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी कदीम जालना पोलिसानी धाव घेऊन या प्रकरणी तापास सुरु केला आहे.घटनेची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडून ही तापास सुरु करण्यात आला आहे. या संपूर्ण घटनेने शासकीय महिला व बाल रुग्णालय परिसरात एकच खबळ उडाली आहे.

### वीजमीटरमध्ये फेरफार करून तब्बल २ कोटी २५ लाख

आली. या तपासणीत मीटरचे बी फेज वा न्युट्रल वीजपुरवठा काढला असता वीज मीटर पूर्णत: बंद होत असल्याचा अहवाल प्राप्त झाला. त्यानंतर सदर दोन्ही मीटर पुढील तपासणीसाठी एल ॲन्ड टी कंपनी म्हैसूर येथे नेण्यात आले. या तपासणीत वीजमीटरला उच्च दाबाने वीजपुरवठा दिल्याने आर व वाय फेजचे रेझिस्टन्स जळालेले असून मीटरमधील पीसीबी बोर्डमधून तुटून मीटरच्या आतील बाजूस पडल्याचे निदर्शनास आले.

### डॉक्टरचे अपहरण

गुन्हा दाखल केला आहे. डॉ.संदीप तुळशीराम परदेशी (वय 59 वर्ष, व्यवसाय, वैदयकीय व्यवसायिक, रा. यशोदीप मारुती आळी शिरूर) यांनी शिरूर पोलिसांत फिर्याद दिली आहे. तक्रारीची तातडीने दाखल घेत शिरूर पोलिसांनी(Shirur police) तातडीने तपास चक्रे फिरवत यातील पुणे ग्रामीण गुन्हे अन्वेशन पोलिस पथकाच्या मदतीने आरोपी कुणाल सुभाषसिंग परदेशी रा . शिरूर यास अटक केली असून न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी दिली. त्याबरोबरच आठ जणांवर गुन्हा दखल करण्यात आला आहे. अशी माहिती पोलिस निरीक्षक सुरेशकुमार राऊत यांनी दिली. तर झालं असं कि आरोपीनी डॉक्टरला आजीला बरे नाही वाटतं नाही तुम्ही तातडीनं चला असे सांगितले त्यानंतर पेशंटला बघण्यासाठी म्हणून डॉक्टर तातडीने निघाले. डॉक्टर दुचाकीवरून जात असताना आरोपी कारमधून येत होते.



## संपादकीय...

# आभासी चक्रव्यूहातले अभिमन्यू

आभासी विश्वात लोकप्रियतेचे झेंडे लावणाऱ्या कुणा 'हिंदूस्तानी भाऊ'वर आणि 'थेरगावची क्वीन'वर वास्तवामधल्या पोलिसांनी अटकेची कारवाई केल्यावर आभासी विश्वात पोपटासारखी बोलणारी ही मंडळी एकदम सुतासारखी सरळ येऊन माफीबिफी मागती झाली असली तरी त्यानिमित्ताने गेली काही वर्षे सतत चर्चेत असलेल्या तरुणांच्या ऑनलाइन जगाचे वास्तव पुन्हा एकदा ऑफलाइन जगावर येऊन धडकले आहे. 'हिंदूस्तानी भाऊ' असो किंवा त्याच्या आवाहनाला प्रतिसाद देत 'ऑनलाइन परीक्षा घ्या' या मुद्द्यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करणारी हजारो मुले असोत; 'थेरगावची क्वीन' असो की तिची मित्रमंडळी आणि तिचे लाखो समाजमाध्यमी अनुयायी असोत, या सगळ्यांनीच सुरेश भटांच्या गझलेमधल्या 'जरी वर्तमानाला कळेना आमुची भाषा..' या अर्ध्याच ओळी त्यांच्याबाबत वास्तव असल्याचे दाखवून दिले आहे. आभासी जगातच अधिक रमणाऱ्या आपल्या आसपासच्या या नव्या पिढीचे वर्तमान आपल्याला समजते आहे का, असा प्रश्न पडावा अशी खरोखरच सध्याची परिस्थिती



आहे.

जगभर सगळ्यांची मने झपाटणारी समाजमाध्यमे, त्यांचा बेसुमार वापर, त्यातून लहानमोठ्या सगळ्यांचाच वाढत चाललेला 'स्क्रीन टाइम' याला आळा कसा घालायचा यावर गेली साताठ वर्षे जगभर चर्चा सुरू आहे. पण हा 'स्क्रीन टाइम' कमी होण्याऐवजी वाढण्याला खऱ्या अर्थाने वेग आला दोन वर्षांपूर्वी. हातातल्या मोबाइलच्या यंत्रामध्ये सामावल्या जाणाऱ्या अवघ्या जगापासून आपल्या मुलांना दूर ठेवू पाहणाऱ्या पालकांचा दोन वर्षांपूर्वी कोविडच्या विषाणूने घात केला आणि मुलांची शाळा-महाविद्यालयेच मोबाइलमध्ये येऊन विसावली. कोविड महासाथीमुळे झालेल्या टाळेबंदीमुळे शाळा-महाविद्यालयांचे तास, लेखी-तोंडी परीक्षाच नाही तर अगदी पीटीदेखील घरबसल्या ऑनलाइन होऊ लागली. त्यासाठी सततच्या हाताळणी करून अगदी छोटी छोटी मुलेदेखील ऑनलाइन विश्वाची जणू एकदम जाणकार होऊन गेली. ऑनलाइन वर्ग घेणाऱ्या शिक्षकांपेक्षा, पालकांपेक्षा या मुलांनाच आभासी जगाची जास्त माहिती आहे, असा अलीकडच्या काळातील अनेकांचा अनुभव आहे. शहरांमधल्या अगदी उच्चभ्रू शाळांमधल्या मुलांपासून ते गावखेड्यातल्या मुलांपर्यंत या सगळ्यामध्ये शाळेचा अभ्यास दुय्यम ठरून ऑनलाइन गेम्स, समाजमाध्यमे, त्यावरचे विश्वरूपदर्शन, तिथले (यूट्यूबर, टिकटॉकर इत्यादींचे) लोकप्रिय चेहरे, त्यांचे सादरीकरण, ओटीटी प्लॅटफॉर्म्स, तिथला सहज उपलब्ध होणारा आशय, व्हिडीओ कॉलिंगमुळे कुणाशीही तत्काळ आणि थेट होऊ शकणारा सचित्र संवाद यांचेच गारूड अधिक मोठे ठरले. आपल्या मुलांचे काय चालले आहे हे पालकांना समजेपर्यंत; खरे तर अनेकांना ते अजूनही समजलेले नाही; ही मुले 'ग्लोबल व्हिलेज'ची नागरिक होऊन गेली होती. त्यांनी आपापल्या वकुबानुसार, आवडीनिवडींनुसार आपापले नायक, आपापले कट्टे निवडले होते. त्यामुळे कुणी 'के पॉप'च्या तालावर थिरकायला लागले तर कुणी 'हिंदूस्तानी भाई'च्या, तर कुणी आणखी काही निवडले. अभ्यासू, वाचणाऱ्या मुलांचे विश्व वेगळे आणि या गोष्टी न आवडणाऱ्या मुलांचे विश्व वेगळे अशी स्पष्ट विभागणी एके काळी होती. अभ्यासू मुलांकडून दंगामस्ती अपेक्षित नव्हती आणि दंगेखोर मुलांना एका जागी बसवले जात नव्हते. आता आतले तपशील वेगळे असले तरी गेल्या दोन वर्षांच्या काळात या सगळ्या मुलांचे विश्व एकच झाले आहे; ते म्हणजे आभासी ऑनलाइन जग. अभ्यासू मुले तिथेही अभ्यासच करत असतील, पण प्रत्यक्षात शाळा सुरू व्हावी का या प्रश्नावर त्यांचेही उत्तर नकारात्मकच असते, असे अनेक पालक सांगतात. शाळा ऑनलाइन हवी असे वाटणाऱ्यांचा शाळेत होणाऱ्या 'सोशलायझेशन'ला नकार असेल आणि परीक्षा ऑनलाइन हवी असे म्हणणाऱ्यांना अभ्यासासाठीच्या मेहनतीला नकार असेल तर नजीकच्या भविष्यात आपण कुठल्या प्रकारच्या समाजाची निर्मिती करत आहोत, हा प्रश्न गंभीर आहे. करोनाच्या महासाथीमुळे परीक्षा ऑफलाइन हवी असे म्हणणारे किती जण करोनाकाळातले बाकीचे सगळे नियम पाळतात, हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. सगळे सण, उत्सव सामूहिक पातळीवर साजरे करायचे, कौटुंबिक सहली करायच्या, निवडणुका करायच्या, हजारोंनी रस्त्यावर उतरून आंदोलने करायची, पण करोनाचा संसर्ग टाळण्यासाठी ऑफलाइन परीक्षा नकोत, या दुटप्पीपणाला कुठेच थारा मिळता कामा नये. खरे तर सगळ्या प्रश्नांवर सोप्पी उत्तरे शोधू पाहणाऱ्यांना आणि अवघड प्रश्न 'ऑप्शन'लाच टाकून बौद्धिक कसरत टाळणाऱ्यांना इतिहास माफ करत नाही आणि भविष्यही थारा देत नाही, हे या मुलांना समजावून सांगणे आवश्यक आहे.

# संगीतप्रेमींच्या कानांना तृप्त करणारा अलौकिक स्वर हरपला



दैवी आवाज अशा शब्दांत ज्यांच्या गायकीचं वर्णन केल्या जातं, त्या देशाच्या गानकोकिळा लता मंगेशकर यांचे वार्धक्यानं निधन झाले आहे. त्या 92 वर्षांच्या होत्या. त्यांच्या निधनाचे वृत्त कळताच देशावर शोककळा पसरली आहे. गेल्या काही दिवसांपासून लतादीदी यांना आजारी असल्यानं रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी त्यांच्यासाठी प्रार्थना करायलाही सांगितलं होतं. अखेर रविवार सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली आहे. लता मंगेशकर यांना कोरोनासोबतच न्यूमोनियाची देखील लागण झाली होती. कोरोनातून त्या ब-या देखील झाल्या होत्या. पण न्युमोनियाची लागण झालेली असल्यानं त्यांच्यावर मुंबईमधील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरु होते.लता मंगेशकर यांचा जन्म मध्य प्रदेशच्या इंदोर शहरात 28 सप्टेंबर 1929 मध्ये झाला. त्यांचे वडील पंडित दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक तसेच नाट्यकलावंत होते. लता मंगेशकर या सर्वात ज्येष्ठ अपत्य होत्या. आशा, उषा, मीना आणि हृदयनाथ ही त्यांची लहान भावंडे आहेत. लता मंगेशकर यांनी पहिली मंगळागौर या चित्रपटासाठी प्रथम पार्श्वगायन केले. त्या भारताच्या हिंदी चित्रपटसृष्टीच्या ख्यातनाम गायक-गायिकांपैकी एक होत्या. हिंदी संगीतविश्वात त्यांना 'लता दीदी' म्हणून ओळखले जायचे. लता मंगेशकरांच्या कारकिर्दीची सुरुवात 1942 मध्ये झाली आणि ती कारकीर्द सहा दशकांपेक्षा अधिक काळ टिकून आहे. त्यांनी 980 पेक्षा अधिक हिंदी चित्रपटांची गाणी गायली आहे.लता मंगेशकर या 'भारतरत्न' पुरस्कार प्राप्त करणा-या भारतातील एम एस सुब्बलक्ष्मी नंतर दुस-या महिला कलाकार आहेत. संगित क्षेत्रातील देदीप्यमान कामगिरीबद्दल हा पुरस्कार त्यांना 2001 साली मिळाला होता. तसेच पद्मविभूषण, पद्मभूषण, महाराष्ट्र भूषण, दादासाहेब फाळके पुरस्कार यासह असंख्य पुरस्कारांनी गौरविण्यात आलं होतं. 1992 मध्ये महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने लता मंगेशकर पुरस्कार नावानेही पुरस्काराची सुरुवात केली. तर मध्य प्रदेश सरकारनेही 1984 सालापासून लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरु केली. जी अविरत सुरू आहे. लता मंगेशकर हे नाव 'गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये 1974 ते 1991 च्या कालावधीत सर्वात जास्त ध्वनिमुद्रणांच्या उच्चांकासाठी नोंदले गेले आहे. संगीत क्षेत्रातील वेगवेगळे विक्रम लता मंगेशकर यांच्या नावावर नोंदले गेले आहे. त्यात सर्वाधिक चित्रपटांमध्ये गायन, सर्वाधिक गाण्यांचे गायन, वेगवेगळ्या भाषांमध्ये गायन अशा प्रकारचे ते विक्रम आहेत. लता मंगेशकरांचे कुटुंब संगीतासाठी प्रसिद्ध असून, सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले, उषा मंगेशकर, मीना मंगेशकर आणि ख्यातनाम संगीतकार-गायक हृदयनाथ मंगेशकर ही त्यांची सख्खी भावंडे आहेत. लता मंगेशकरांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे मराठी नाट्य-संगीताचे प्रसिद्ध गायक होते. 'थांबला असला श्वास तरी सूर राहील सदा सोबतीला...' जो सूर ऐकत देशाच्या अनेक पिढ्यांना गाणं म्हणजे काय हे कळलं. संगीत विश्वातील मातब्बर मंडळी ज्या सुरांना 'ईश्वराचं देणं' मानत वंदन करतात अशा भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांचा स्वर हरपला. देशासह जगभरातील श्रोत्यांच्या जगण्याला अमृतसंजीवनी देत आलेला स्वर्गीय सूर हरपल्यानं आज संपूर्ण देश शोकाकूल झाला आहे. जवळजवळ सहा दशकांच्या प्रदीर्घ आणि देदीप्यमान कारकीर्दीत दीदींनी जितक्या संगीतप्रेमींना मग तो सर्वसामान्य श्रोता असो किंवा दर्दी ज्या प्रमाणात आनंद दिला आहे, तितका आनंद देशाच्या पॉप्युलर कल्चरच्या इतिहासात कुठल्याही इतर कलाकाराने दिलेला नाही. आकाशात देव आहे का असं कुणी विचारलं तर देवाचं माहित नाही. पण आकाशात सुर्य आहे, चंद्र आहे आणि लताचा दीदींचा स्वर आहे! दिवस-रात्र अशी कुठलीही वेळ नाही किंवा क्षण नाही की लता दीदींचा स्वर या जगात कुठून तरी कुठेतरी जात येत असतो, अशा शब्दांत पु.ल.देशपांडे यांनी लतादीदींच्या महतीचं वर्णन केलं होतं. दयाळू आणि काळजी घेणा-या लता दीदी आपल्याला सोडून निघून गेल्या. त्या आपल्या देशात एक पोकळी सोडून गेल्या आहेत, जी भरली जाऊ शकत नाही. येणा-या पिढ्या त्यांना भारतीय संस्कृतीतील एक महनीय व्यक्ती म्हणून नेहमीच स्मरणात ठेवतील. त्यांच्या मधूर आवाजात लोकांना मंत्रमुग्ध करण्याचे अद्वितीय सामर्थ्य होते. हृदय आणि मन यांपासून देवाने आवाज सारख्याच अंतरावर ठेवला आहे असं म्हणतात. कोणतीही महान गायकी ही भावना आणि तंत्र या घटकांचा समन्वय असते. लता दीदींच्या आवाजात या दोन्ही घटकांचा अप्रतिम संगम झाला होता. लता दीदींची प्रतिभा ब-याच प्रमाणात निसर्गदत्त असली तरी त्यात उत्कट संगीतसाधना आणि कुशाग्र बुद्धिमत्ता यांचा खूप मोठा सहभाग होता. जोपर्यंत भारतीयांच्या मनात धर्मप्रेम व देशप्रेम जागं आहे तोपर्यंत प्रत्येक गणेशोत्सवात, शिवजयंतीला, स्वातंत्र्य व प्रजासत्ताकदिनी लतादीदींची गाणी ऐकू येत राहतील. कबीर, मीरा व सूरदासांच्या भजनांतून, ग़ालिबच्या गजलांतून, 'शिवकल्याण राजा'तल्या गाण्यांतून, ज्ञानदेवांच्या पसायदानातून आणि तुकोबांच्या अभंगांतून त्यांचा आवाज मनामनांत कायमचा साठवून ठेवला जाणार आहे. लता दीदींच्या आयुष्याचा प्रवास जरी आज थांबला असला तरी दैवी सूरांमधून व सुमधुर आवाजातून भारतीयांच्या अंतकरणात दीदींनी लावलेला स्नेहदीप सदैव चैतन्यानं युक्त राहील. लता मंगेशकर यांचे निधन हे देशाचे मोठे नुकसान आहे. त्यांचे संगीत अनेक पिढ्यांना स्मरणात राहील. अनेक दशकं भारतीयांच्या मनावर अधिराज्य गाजवणा-या गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांनी आपल्या अनेक दशकांच्या कारकिर्दीत अनेक टप्पे गाठले असले तरी त्यांच्या मनात एका गोष्टीची खंत कायम राहिली. पूर्णवेळ शास्त्रीय संगीत करता आलं नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली होती. लता मंगेशकर यांनी एका मुलाखतीत ही बाब सांगितली होती. लता मंगेशकर यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे प्रसिद्ध गायक, संगीकार होते. लता मंगेशकर यांनी गायनाचे धडे वडिलांकडून गिरवले होते. लता मंगेशकर यांना आपल्या संगीत कारकिर्दीत तीन-चार गुरु लाभले होते. मास्टर दिनानाथ मंगेशकर हे त्यांचे पहिले गुरु होते. त्यानंतर अमान अली खाँ भेंडीबाजारवाले, अमानत खाँ देवासवाले यांच्याकडे लता मंगेशकर यांनी शास्त्रीय संगीताचे धडे गिरवले. त्याशिवाय, बडे गुलाम अली खाँ साहेबांच्या एका शिष्याकडेही लता मंगेशकर शास्त्रीय संगीत शिकले.लता मंगेशकर यांचे शास्त्रीय संगीतावर प्रेम होते. मात्र, लहान वयात आलेल्या कौटुंबिक जबाबदारीमुळे लता मंगेशकर यांना पूर्णवेळ शास्त्रीय गायन करता आलं नाही. लता मंगेशकर यांनी एका मुलाखतीत सांगितले की, पुनर्जन्म मिळाला तर मला शास्त्रीय संगीत गायला अधिक आवडेल. या जन्मात ही इच्छा अपूर्ण राहिली होती. कौटुंबिक जबाबदारींमुळे पार्श्वगायनातून बाहेर पडण्याचा विचार करू शकत नव्हते. शास्त्रीय संगीतासाठी वेळ देणे अशक्य होते. त्यामुळे माझ्या आवडीला नाईलाजाने मुरड घालावी लागली असे लता मंगेशकर यांनी म्हटले. वयाच्या पाचव्या वर्षी लता मंगेशकर यांना पहिल्यांदा नाटकात काम करण्याची संधी मिळाली. त्यांची सुरुवात अभिनयापासून झाली असली, तरी त्यांची आवड फक्त संगीतात होती. 1942 मध्ये त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यावेळी त्या फक्त 13 वर्षांच्या होत्या. नवयुग फिल्म कंपनीचे मालक आणि त्यांच्या वडिलांचे मित्र मास्टर विनायक दामोदर कर्नाटकी यांनी त्यांच्या कुटुंबाची काळजी घेतली आणि लता मंगेशकर यांना गायिका आणि अभिनेत्री बनण्यास मदत केली.लता मंगेशकर यांच्या मृत्यूनंतर दोन दिवस राष्ट्रीय दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. हा राष्ट्रीय दुखवटा जाहीर करताना त्या व्यक्तीचे सामाजिक क्षेत्रातील कर्तृत्व आणि योगदान लक्षात घेऊन सरकार याविषयी निर्णय घेत असतं. त्यामुळेच लता मंगेशकर यांच्या मृत्यूनंतर दोन दिवस राष्ट्रीय दुखवटा जाहीर करण्यात आला असून राष्ट्रध्वज अर्ध्यावर फडकावला जाणार आहे. लता दीदींच्या अतुलनीय कर्तृत्वाला प्रणाम करत त्यांच्या आत्म्याला शांती लाभो या प्रार्थनासह भावपूर्ण श्रद्धांजली..!

# बाळाच्या किरकिरण्याचा वैताग, बापाने दोन वर्षांच्या लेकीला संपवलं




(Bhayandar) पश्चिम भागातील मुर्धा गाव परिसरात ही अंगाचा थरकाप उडवणारी घटना घडली. रिक्षा चालक बापाला बेड्या ठोकून पोलिसांनी पुढील तपास सुरु केला आहे.

मुंबई : लहान बाळ म्हटलं की ते रडणारच. मात्र दोन वर्षांच्या लेकराच्या रडण्याने वैतागलेल्या सैतान बापाने टोकाचं पाऊल उचलल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सतत किरकिरणाऱ्या बाळाचा सख्ख्या बापानेच खून (Father kills Daughter) केला. विशेष म्हणजे हत्येच्या घटनेला अपघात असल्याचं भासवण्याचा प्रयत्नही आरोपीने केला. दोन वर्षांच्या मुलीची बापाने गळा आवळून हत्या (Girl Child Murder) केली. घटनेच्या वेळी चिमुकलीची आई घरात नव्हती. घरात खेळता-खेळता मुलगी गॅस स्टोव्हवर पडून मृत्युमुखी पडली, असा बनाव त्याने पत्नीला फोन करुन रचला. परंतु पोस्ट मार्टमच्या अहवालात नराधम बापाचं बिंग फुटलं. मुंबईजवळच्या भाईंदर

**काय आहे प्रकरण?**

दोन वर्षांच्या मुलीच्या सततच्या रडण्याला कंटाळून पित्याने तिची निर्घृण हत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. हा अपघात असल्याचं भासवण्याचाही त्याने प्रयत्न केला. मात्र, पोस्टमॉर्टमच्या अहवालात त्याच्या या भीषण गुन्ह्याचा पर्दाफाश झाला.

**अपघाताचा बनाव**

रिक्षाचालक असलेल्या आरोपीने पोलिसांच्या जाळ्यातून सुटण्यासाठी, मुलीचा घरात खेळत असताना अपघात झाल्याची कहाणी रचली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भाईंदर (पश्चिम) जवळील मुर्धा गाव परिसरातील एका इमारतीत ही घटना घडली. मुलीची आई कामानिमित्त बाहेरगावी गेल्याने घटनेच्या वेळी बापलेक दोघेच घरात होते.

**पोस्टमार्टमने बिंग फोडलं**

आरोपीने मुलीचा गळा दाबून खून केला. मात्र खेळता खेळता ती चुकून गॅसच्या शेगडीवर पडल्याची माहिती तिच्या आईला फोन करुन दिली. मुलीला तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, मात्र तिथे पोहोचताच तिला मृत घोषित करण्यात आले. शव विच्छेदन अहवालात मात्र मुलीचा मृत्यू गुदमरून झाल्याचे स्पष्ट झाले.

**मुलीच्या रडण्याचा वैताग**

याशिवाय मुलीच्या डोक्यावर जखमेच्या खुणा दिसत होत्या. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास केला, तेव्हा समजले की आरोपी अनेकदा कामावरुन घरी परत आल्यानंतर मुलीच्या सततच्या रडण्याबद्दल राग व्यक्त करायचा. आरोपीला अटक करून भादंवि कलम 302 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.

# हॉटेलसमोर उभा होता तरुण, फिल्मी स्टाइलनं दोन तरुण दुचाकीवरुन आले अन्...



ठाणे : ठाणे येथील कोलबाड परिसरात काल, एका युवकावर मोटरसायकलवरून आलेल्या दोन तरूणांनी गोळीबार केला. या दोघा हल्लेखोरांनी तरूणावर तीन गोळ्या झाडल्या. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली. तरूणाला जखमी अवस्थेत खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्यावर उपचार सुरू असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. ठाण्यात फिल्मी स्टाइलने दुचाकीवरून आलेल्या दोघांनी एका तरूणावर गोळीबार केला. ही घटना कोलबाड परिसरात घडली. ठाण्यातील कोलबाड परिसरातील केतन ठक्कर नामक तरूण काल रात्रीच्या सुमारास कोलबाड परिसरातील एका हॉटेलसमोर आला असता, त्या ठिकाणी मोटरसायकलवरून दोन अज्ञात तरूण आले. त्यांनी केतनवर तीन गोळ्या झाडल्या. गोळीबाराच्या आवाजानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. केतनवर हल्ला करून दोघेही हल्लेखोर पसार झाले. स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली. या गोळीबारात जखमी झालेल्या केतनला त्यांनी एका खासगी रुग्णालयात नेले. त्याच्यावर उपचार सुरू असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी अज्ञात हल्लेखोरांविरोधात ठाण्यातील राबोडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गोळीबार पूर्ववैमनस्यातून केला असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. राबोडी पोलिसांनी खबरी आणि तांत्रिक मदतीने तपास सुरू केला आहे. हल्लेखोरांचा शोध घेतला जात आहे.

# 'थेरगाव क्वीन'ची मस्ती उतरेना, पिंपरी पोलिसांना व्हिडीओतून चॅलेंज





पिंपरी चिंचवड : 'थेरगाव क्वीन' (Thergaon Queen) या इन्स्टाग्राम हँडलमुळे कुप्रसिद्ध झालेली अल्पवयीन मुलगी पोलिसांच्या ताब्यातून सुटली, मात्र तिची मिजास काही कमी झाल्याचं दिसत नाही. कारण पोलिसांनी बेड्या ठोकल्यानंतरही ती सुतासारखी सरळ झाली नाही, तर कुत्र्याचं शेपूट वाकडं ते वाकडंच या म्हणीचा प्रत्यय देत आहे. पिंपरी चिंचवड (Pimpri Chinchwad Crime) मधील "थेरगाव क्वीन" नावाने इंस्टाग्राम अकाऊंट (Instagram Account) चालवणाऱ्या मुलीने अश्लील शिवीगाळ करत व्हिडीओ पोस्ट केल्या प्रकरणी वाकड पोलिसांनी गुन्हा दाखल करत तिला अटक केली होती. मात्र पोलिसांच्या ताब्यातून सुटतात त्या मुलीने पुन्हा एक व्हिडीओ इंस्टाग्रामवर पोस्ट करत थेट पिंपरी चिंचवड पोलिसांना आव्हान दिलं आहे.

**काय आहे चॅलेंज?**

वाकड पोलिसांनी संबंधित मुलीला 30 जानेवारी रोजी अटक केली होती. तेव्हाचा व्हिडीओ तिने आपल्या इंस्टाग्राम अकाऊण्टवर पोस्ट केला आहे. त्यातून तिने पोलिसांना खुलं आव्हान दिल्याचं पाहायला मिळत आहे. 'मोठी हस्ती आहे आपण, तीनपाट थोडीच आहे. ढगात आहे ना आपण, खालनं किती पण दगडं मारु द्या आपल्यापर्यंत येत नाहीत भाऊ कुणाची दगडं'... 'अख्ख्या ब्रह्मांडाला शनि बोलून एकटा मी बास होतो, आमच्या बरोबर चालण्याचा बी त्रास होतो, नींद हराम करतो...'

असं गाणं बॅकग्राऊण्डला वाजताना ऐकू येतं. गेल्या काही दिवसांपासून तिच्या आक्षेपार्ह संवादाचे व्हिडीओ सोशल मीडियावर चिंतेचा विषय ठरत आहेत. शिवीगाळ, भांडणापासून सुरु होणारी थेरगाव क्वीनची जीभ थेट हत्या करण्यापर्यंत पोहोचल्याने तिचे व्हिडीओ चर्चेत आले होते.

**मुलांच्या सोशल मीडिया वापराकडे लक्ष द्या!**

लॉकडाऊनमध्ये शिक्षण ऑनलाईन झालं, अशा वेळी पालकांनी त्यांच्या सोशल मीडिया वापराकडे लक्ष द्यावे, असा मौलिक सल्ला मानसोपचार तज्ज्ञांनी दिला आहे. मानसोपचार तज्ज्ञ डॉ. श्वेताली घोलप यांनी सोशल मीडियावर सुरु असलेल्या मुलांच्या या वागणुकीवरुन चिंता व्यक्त केली. मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बारीक लक्ष ठेवण्याची गरजही व्यक्त केली आहे.

# आंबा बागेकडे जाताना दुचाकीचा टायर फुटला; पुढे जे काही घडलं ते भयंकर...




रत्नागिरी: मुंबई-गोवा महामार्गावर कोंडये येथे दुचाकीचा टायर फुटल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. महेश करंदीकर (वय ३०, रा. राजापूर) असे तरूणाचे नाव आहे. शनिवारी सायंकाळी पावणेचार वाजताच्या सुमारास हा अपघात झाला. महेश हा राजापुरातील हॉटेल मालक अशोक करंदीकर यांचा मुलगा आहे. त्याच्या अपघाती मृत्युमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. महेश यांच्या अपघाताचे वृत्त कळताच अनेकांनी ग्रामीण रुग्णालयात तातडीने धाव घेतली. महेश हा आपली दुचाकी घेऊन मित्र वैभव धर्माधिकारी याच्यासोबत राजापूरकडून सिंधुदुर्गकडे पोंबुर्ले येथे आपल्या बागेकडे जात होता. कोंडये येथे त्याच्या दुचाकीचा टायर फुटला व हा अपघात झाला. यात महेश याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा मृत्यू झाला. तर सहकारी वैभव धर्माधिकारी हा किरकोळ जखमी झाला आहे. महेश हा होतकरू तरूण होता.

# 'त्यांच्या स्वरात ईश्वराला जागवण्याची व तान्हुल्यांना निजवण्याची जादू होती' : राज्यपाल भगतसिंह कोश्यारी

## "लतादीदींनी भारतीय संगीत समाजाच्या शेवटच्या माणसापर्यंत पोहचविले"




राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी महान पार्श्वगायिका भारतरत्न लता मंगेशकर यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

भारतरत्न लता मंगेशकर यांचे निधन ही देशातील प्रत्येक कुटुंबाकरिता दुःखद बातमी आहे. हा दिवस अटळ आहे हे माहिती असून देखील हा दिवस येऊच नये असे वाटत होते.

भारतरत्न लता मंगेशकर यांचे संगीत देश, भाषा व काळ यांच्या सीमा उल्लंघून थेट अंतरात्म्याला जागवणारे होते.

आपल्या भावगीतांनी ईश्वराला जागविण्याची, प्रेमगीतांनी तरुणाईला खुलवण्याची, देशभक्तीपर गीतांनी जवानांना स्फुरण देण्याची तर प्रेमळ अंगाई गीतांनी तान्हुल्यांना निजविण्याची अद्भुत जादू त्यांच्या स्वरात होती.

अभिजात भारतीय संगीत सुलभ करून लतादीदींनी ते समाजाच्या शेवटच्या माणसापर्यंत पोहचविले. आपल्या दैवी स्वरांनी त्यांनी असंख्य जनसामान्य, शेतकरी तसेच कष्टकरी लोकांना सकारात्मक जीवन जगण्याची नित्यनवी उमेद, ऊर्जा व उत्साह दिला.

लतादीदी या तब्बल आठ दशके भारतीय चित्रपट सृष्टीची ओळख होत्या. चित्रपट व संगीत सृष्टीच्या सुवर्ण काळातील साक्षात हिरकणी होत्या.

भारतरत्न लतादीदी महाराष्ट्राच्या कन्या होत्या याचा संपूर्ण महाराष्ट्राला सार्थ अभिमान आहे. त्या आपल्या जीवनकाळात झाल्या हे आपले सद्भाग्य होते.

लता मंगेशकर यांच्या निधनामुळे संगीत विश्वातील देव्हारा रिकामा झाला आहे. त्यांचा दैवी स्वरदीप मात्र मनामनात तेवतच राहील.

या दुःखद प्रसंगी संपूर्ण राज्याच्या वतीने लतादीदींना आपली भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो व आपल्या शोकसंवेदना आशाताई, उषाताई, मीनाताई, पं. हृदयनाथ तसेच संपूर्ण मंगेशकर कुटुंबियांना कळवतो.

लतादीदींच्या देशविदेशातील करोडो चाहत्यांना देखील आपल्या शोकसंवेदना कळवतो, असे राज्यपाल कोश्यारी यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

# डोंबिवलीत जमिनीच्या वादातून शिवसेनेच्या माजी नगरसेवकाची शेतकऱ्याला बेदम मारहाण



प्रदीप भणगे, डोंबिवली : कल्याण ग्रामीण भागातील १४ गावात पुन्हा एकदा जमिनीचा वाद उफाळला आहे.१५ दिवसांपूर्वी जमिनीवरुन वाद झाला होता. दरम्यान ३ फेब्रुवारी रोजी रात्री ८.१५ दरम्यान जबरदस्तीने जमीन लाटण्यासाठी एका शेतकरी कुटुंबीयांना डोंबिवली मधील शिवसेनेच्या माजी नगरसेवकाने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेला २३ तास उलटून गेले तरी शीळ-डायघर पोलिसांनी अद्यापही गुन्हा केला नाही. त्यामुळे मनसेचे आमदार राजू पाटील यांनी गेल्या तीन तासांपासून थेट पोलीस अधिकाऱ्याच्या दालनात ठाण मांडून बसले होते. मनसे आमदार राजू पाटील यांच्या आक्रमक पवित्र्यामुळे पोलिसांचीही धावपळ सुरु झाली . तसेच पोलीस ठाण्याबाहेर मनसे कार्यकर्त्यांनी आणि गावकऱ्यांनी गर्दी जमू लागली आहे. मात्र, पोलीस का गुन्हा दाखल करत असा सवाल उपस्थित केला जात आहे. पोलिसांनी यावर बोलण्यास नकार दिला आहे. याबाबत संबंधित शिवसेनेच्या माजी नगरसेवकाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यांच्याशी अद्याप संपर्क होऊ शकलेला नाही. कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील मोकाशी पाडा, दहीसर आणि दहिसर मोरी या तीन गावांमध्ये राहणाऱ्या शेतकऱ्यांची २८५ एकर शेती आहे. या शेतीवर विकास प्रकल्प राबवले जाणार आहेत. या महत्वाच्या जागेवर सर्व बिल्डरांचा डोळा आहे. गुरुवारी रात्री सव्वा आठ वाजताच्या सुमारास चार ते पाच गाड्यांतून काही जण लाठ्याकाठ्या घेऊन आले. मोकाशी पाड्यातील माजी पोलीस पाटील एकनाथ मोकाशी आणि त्यांचा मुलाला प्रशांत मोकाशी याला बेदम मारहाण केली. इतकेच नव्हे तर महिलांनाही धक्काबुक्की करण्यात आली. यात एकनाथ मोकाशी यांना डोक्याला आणि पायाला मार लागला आहे. तर प्रशांत मोकाशी याला डोक्याला आणि सम्पर्ण अंगाला मार लागला आहे. याबाबत मेडिकलची प्रकिऱ्या पूर्ण करुनही पोलिसांनी गुन्हा केला नाही. तर आता या घटनेला तब्बल २३ तास झाले तरी गुन्हा केला नाही.त्यामुळे मनसे आमदार राजू पाटील चांगलेच संतापले आणि त्यांनी तीन तासांपासून थेट पोलीस अधिकाऱ्याच्या दालनात ठाण मांडले आहे.ही बातमी समजताच मनसे कार्यकर्ते आणि १४ गावातील ग्रामस्थ पोलीस स्टेशन मध्ये दाखल झाले आहेत. मात्र शीळ-डायघरचे पोलीस का गुन्हा दाखल करत असा सवाल उपस्थित केला जात आहे. त्यामुळे आतातरी गुन्हा दाखल होतो का, हे पाहावे लागेल. या गुन्ह्यात जे आरोपी आहेत त्यांचे पालकामंत्र्यांसोबत बॅनर लागले आहेत. तुम्ही तुमच्या पदाधिकारीला वाचवण्यासाठी हे करतायत का? हा कायद्याचा राज्य आहे का? असा सवाल मनसे आमदार राजू पाटील यांनी केला. माझा मुख्यमंत्र्यांना प्रश्न आहे की, हेच चालणार असेल तर बिहार बरा. जर महिलांना हात टाकला जात असेल तर आणि एफआयआर दाखल होत नसले तर लालत आहे तुमच्यावर, बांगड्या घालून घरी बसा तुम्ही. आमच्याकडे सत्ता आहे, आमच्या लोकांवर अन्याय करून तुम्ही अशाप्रकारे त्यांना दाबाल तर आम्ही न्यायालयात जाऊ, असे राजू पाटील यांनी म्हटेल.

**मारहाण झालेला शेतकरी**

**काय म्हणाला?**

पोलिसांनी अजूनपर्यंत एफआयआर कॉपी दिलेली नाही. काय माहीत त्यांच्यावर प्रेशर आहे. गुन्हेगारांना शिक्षा झाली पाहिजे, इतकीच आमची मागणी आहे. मारहाती माझ्या स्वतःच्या डोक्याला मार आहे. मुलाच्या डोक्याला पाच टाके बसले आहेत पाठीवर, गुडघ्यावर दांडक्याने मारले असून पन्नास ते साठ लोक आले होते. महिलांना व कुटूंबातील काही जणांना धक्काबुक्की केली आहे, असे एकनाथ मोकाशी यांनी सांगितले.

त्यांच्या मुलानेही याबद्दल माहिती दिली. काल रात्री साडेआठच्या दरम्यान माज्या वडिलांवर रमेश सुकऱ्या म्हात्रे, वैभव पाटील यांच्यासह त्यांचे पन्नास साठ सहकारी होते. त्यांनी अचानकपणे दांडके, दगड, विटा याने हल्ला केला. माझ्या डोक्याला पाच टाके पडले असून तसेच डोक्याला रिव्हॉल्व्हरने मारले. तसेच छातीवर,पाठीवर काठीने,हॉकी स्टिकने मारहाण केली, असेही प्रशांत मोकाशी यांनी म्हटले.

# धक्कादायक ! जेवण व्यवस्थित देत नाही, लग्नही लावून देत नाहीत

## पोराने बापाला जागेवर मारलं!



औरंगाबाद : औरंगाबाद जिल्ह्यातील वाळूज पोलीस ठाणे अंतर्गत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. वडील लग्न लावून देत नाही आणि जेवायलाही व्यवस्थित देत नाही, या शुल्लक कारणावरुन मुलानेच वडिलांच्या छातीवर, पोटावर तसंच गुप्तांगावर लाथा मारून बापाची हत्या केल्याचं समोर आलं आहे. ही घटना दहेगाव बंगला भागात घडली आहे. अनिल कडूबाळ सोनवणे (वय २२) असं आरोपी मुलाचे नाव असून, कडूबाळ मुरलीधर सोनवणे (वय ५५) असं मृत्य बापाचं नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत्य व्यक्ती कडूबाळ यांची पत्नी अलका सोनवणे यांनी दहा ते बारा वर्षांपूर्वी जाळून घेऊन आत्महत्या केली आहे. तेव्हापासून कडूबाळ हे मोठा मुलगा सुनिल आणि लहान मुलगा अनिल या दोन्ही मुलांसोबत राहात होते. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून लहान मुलगा अनिल हा तुम्ही घरात चांगले जेवण बनवून देत नाही म्हणून वडिलांसोबत वाद घालत होता. कधीकधी यावरून वडिलांना मारहाण सुद्धा करत होता. दरम्यान, शनिवारी ( ता.०५ ) रोजी रात्रीच्या सुमारास अनिल याने पुन्हा याच कारणावरून झोपलेल्या वडिलांच्या छातीवर, पोटावर आणि गुप्तभागावर लाथा मारत बेदम मारहाण केली. या मारहाणीत गंभीर जखमी झाल्याने कडूबाळ यांचा जागीच मृत्यू झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी या घटनेबाबत कळताच गावकऱ्यांनी वाळूज पोलिसांना फोनवरून याबाबत माहिती दिली.त्यानंतर वाळूज पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत, आरोपीला ताब्यात घेत कडूबाळ यांचा मृतदेह रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला.

**लग्नाचा तगादा**

वडिलांची हत्या करणारा अनिल चांगल्या जेवणाबरोबरच लग्नासाठी सुद्धा आपल्या वडिलांसोबत वाद घालायचा. माझं लवकर लग्न करून द्या यासाठी तो वडिलांना शिवीगाळ करत मारहाण करायचा. त्यामुळे मोठा भाऊ सुनील आणि वडील अनिलला प्रचंड घाबरत होते.

# तलवारी घेत नंगानाच करणाऱ्या भाईंची इलाक्यातच जिरवली मस्ती



नाशिकः देशभरात नाशिकचे (Nashik) उद्योनगरी आणि पर्यटननगरी म्हणून नाव विख्यात आहे. आता याच नगरीची क्राईम (Crime) नगरीकडे होणारी वाटचाल अतिशयक ही धक्कादायक आणि धोकादायक अशीच आहे. काही दिवसांपूर्वी एकामागे एक झालेले तीन खून. त्यात एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याची झालेली हत्या. या साऱ्या घटनांनी राज्य ढवळून निघाले. हे प्रकरण थेट विधिमंडळात पोहचले. आता त्याच नाशिकमध्ये चक्क हातात कोयते आणि तलवारी घेऊन काही भाई लोकांनी चक्क रस्त्यावर नंगानाच केल्याचे समोर आले. विशेष म्हणजे हे सारे खून, हाणामाऱ्या प्रकरणातील आरोपी आहेत. याचा सुगावा पोलिसांनी लागताच त्यांनी या भाई लोकांची मस्ती चक्क धिंड काढून जिरवली. त्यानंतर कोणी पुन्हा असा प्रकार करायला धजावणार नाही, असा पोलिसी इंगा त्यांना दाखवला. तुम्हीही हा पोलिसी खाक्या जरूर जाणून घ्या... नाशिकमधल्या सातपूर भागातली ही घटना. या परिसरात अनेकजण भाईगिरी करायला पुढे असतात. हाताता काम नसते. त्यात भाईगिरी करायला कसलीही गुंतवणूक म्हणा अथवा श्रम करावे लागत नाहीत. एखादे टोळके सोबत असले की, लोकही आपोआप नरमतात. मात्र, या लोकांची भाईगिरी जास्त झाली. त्यातले अनेकजण खून, हाणामारी प्रकरणातले आरोपी. त्यांनी हातात कोयते, तलवारी घेऊन चक्क रस्त्यावर नंगानाच केल्याचे समोर आले.

# आमदारकीच्या आमिषाने माजी उपसभापतीला १६ लाखांचा गंडा



वसई पंचायत समितीच्या माजी उपसभापतीला आमदारकीचे आमिष दाखवून एका भोंदूबाबाने तब्बल १६ लाखांचा गंडा घातल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी वसई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी भोंदूबाबाच्या दोन साथीदारांना अटक केली आहे. मात्र या प्रकरणातील मुख्य आरोपी फरार आहे.

वसई पंचायत समितीचे माजी उपसभापती नरेंद्र पाटील यांना २०२०मध्ये एका भोंदू बाबाने संपर्क साधला. आपल्याकडे एकमुखी रुद्राक्ष असून हा रुद्राक्ष जवळ बाळगला, तुम्ही आमदार व्हाल, असे त्याने पाटील यांना सांगितले. हा एकमुखी रुद्राक्ष पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडेदेखील असून त्यांची भरभराट झाली असल्याचेही त्याने सांगितले. त्यांच्या बोलण्याला भुलून पाटील यांनी भोंदूबाबाला रुद्राक्षासाठी एक वर्षाच्या कालावधीत तब्बल १६ लाख रुपये दिले. मात्र तरीही रुद्राक्ष न मिळाल्याने त्यांनी भोंदू बाबाशी संपर्क साधला असता, त्याने आपला मोबाइल बंद करून ठेवल्याचे दिसून आले.

# डॉक्टर पत्नीचा थंड डोक्याने केला खून, धक्कादायक माहिती समोर



नाशिकः नाशिक (Nashik) महापालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ सुवर्णा वाजे (Dr. Suvarna Waje) यांच्या खुनाप्रकरणी नाशिक पोलिसांनी आणखी काही लोकांचे जबाब नोंदवले आहेत. वाजे यांचे पती संदीप वाजेला अटक केल्यानंतर, आता त्याला मदत करणाऱ्या इतर 5 साथीदारांचा शोध देखील पोलीसांनी सुरू केला आहे. कौटुंबिक कारणांमुळे संदीप वाजेने आपल्या डॉक्टर पत्नीचा काही साथीदारांच्या मदतीने भीषण खून केला आहे. सध्या संदीपला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. दरम्यान, तपासात दररोज नवनवीन अशा धक्कादायक गोष्टी पोलिसांसमोर येत असल्याचे समजते. विशेष म्हणजे संदीपला सहकार्य करणारे साथीदारही पोलिसांच्या रडारवर आहेत. त्यांच्यापर्यंत पोलिसांचे हात पोचले असून, ते त्यांना कधीही उचलू शकतात, अशी माहिती मिळतेय.

**कसा काढला काटा?**

डॉ. सुवर्णा वाजे-जाधव या बेपत्ता होत्या. त्यामुळे त्यांच्या कुटुंबाने पोलिसांत तक्रार नोंदवली होती. 25 जानेवारी रोजी, मंगळवारी रात्री मिल्ट्री गेटसमोर त्यांची गाडी जळालेल्या अवस्थेत सापडली. त्यात जळून कोळसा झालेली हाडे होती. ही हाडे सुद्धा त्यांची असल्याची समजते. वाडीवऱ्हे पोलिसांनी या घटनेला दुजोरा दिला आहे. शिवाय 'डीएनए' अहवालातही त्याची पुष्टी झाली आहे. पोलिसांनी याप्रकरणी डॉ. सुवर्णा वाजे यांच्या बहीण आणि रुग्णालयातील सहकाऱ्यांचे जबाब नोंदवले आहेत. माहेरच्या नातेवाईकांनीही त्यांना काही महत्त्वाची माहिती दिली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्कः-9594418181 / 8424989898